Government of Maharashtra

# RAJARAM COLLEGE, KOLHAPUR

*(NAAC "A+" Grade with CGPA 3.31)*

Website: www.rajaramcollege.edu.in Email: rajaramcollege@gmail.com

# MEDIA, NEWS & ARTICLES

## AY 2024-25



# शां. ब. मुजुमदार यांना 'जीवनगौरव पुरस्कार

### सोमवारपासून रंगणार 'राजाराम महोत्सव': विविध कार्यक्रमांचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील १४४ वर्षांची परंपरा असलेल्या राजाराम महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार गडहिंग्लजमधून जाऊन शैक्षणिक साम्राज्य उभे करणाऱ्या सिम्बायोसिस संस्थेचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांना देण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता बोडके यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

राजाराम महाविद्यालयाच्या वतीने २७ ते २९ जानेवारी या कालावधीत 'राजाराम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि. २७) सकाळी १०.३० वाजता राज्याचे उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. डॉ. शिर्के यांच्या हस्ते शां. ब. मुजुमदार यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या वेळी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शां. ब. मुजुमदार यांनी सिम्बायोसिस सारख्या संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण आपल्या भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहे. त्याच्या कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जात आहे. या कार्याची दखल घेत त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

या महोत्सवांतर्गत विविध महाविद्यालयीन व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. काव्यांगण, लेखकाशी मुक्तसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम- चित्रकथी, विनोदी कथाकथन, डॉ. सचिन जगताप यांचे बासरीवादन, विविध गुणदर्शन कार्यक्रम आणि नितीन कुलकर्णी यांचे एकपात्री असे विविध कार्यक्रम होणार आहेत. यावेळी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक डॉ. विश्वनाथ देशमुख, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. धनंजय देवळालकर, डॉ. संजय पाठारे, डॉ. संजय मोरये आणि डॉ. ऋषिकेश दळवी उपस्थित होते.






# कष्ट, सचोटी, सातत्यानेच यशस्वी व्हाल

प्रतिनिधी
कोल्हापूर

निष्ठा, प्रामाणिकपणा, सचोटी आणि सातत्याने स्वत:ला नवीन काहीतरी शिकवत राहिल की आपण नक्की यशस्वी व्हाल, असा संदेश विनया गोरे यांनी विद्यार्थ्यांना दिला. राजाराम कॉलेज शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करत आहे. त्याबद्दल आयोजित केलेल्या राजाराम महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. डॉ. एम. के.गोंधळी यांनी विनोदी कथा सांगून विद्यार्थ्यांना मनमुराद हसवले.

'संवाद' या कार्यक्रमांतर्गत साहिल माने आणि संस्कृती चव्हाण यांनी डॉ. मेघा तावडे –परुळेकर, सविता सगरे व मिलिंद धोंड यांची मुलाखत घेतली. डॉ. मेघा तावडे यांनी व्यक्तिमत्त्व विकासावर मार्गदर्शन केले. सविता सगरे, यांनी विमा क्षेत्राची विद्यार्थ्यांना माहिती दिली. मिलिंद धोंड यांनी एनजीओचे व्यवस्थापन व स्थापनेसंबंधी मार्गदर्शन केले. काव्यांगण या कार्यक्रमात मंदार पाटील, आनंद रंगराज, परशूराम कांबळे, विष्णू पावले, आबा पाटील, बबलू वडर, विक्रम राजवर्धन यांनी कवितांचे सादरीकरण केले. माजी राजारामीयन डॉ. सचिन जगताप यांच्या बासरी वादनाने कॉलेज परिसर संगीतमय झाला.

अविनाश देशमुख यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. अनिता घोडके, डॉ. विश्वनाथ देशमुख, डॉ. अंजली पाटील आदी उपस्थित होते.

कोल्हापूर : राजाराम कॉलेजमधील राजाराम महोत्सवात मार्गदर्शन करताना डॉ. एम. के. गोंधळी. सोबत डॉ. विश्वनाथ देशमुख, प्राचार्य डॉ. अनिता घोडके, अंजली पाटील.

- **विनया गोरे यांचा राजाराम कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सल्ला**



# राजाराम महाविद्यालयाचा 'राजाराम महोत्सव' २७ पासून

### शांताराम मुजुमदार यांना यंदाचा जीवन गौरव पुरस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजाराम महाविद्यालय हे १४४ वर्षांची दिमागदार परंपरा असलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाचा 'राजाराम महोत्सव ' हा तीन दिवसाचा सोहळा सोमवार ता. २७ जानेवारी पासून सुरू होत आहे. सकाळी १० वा. गणेश वंदना,१० .३० वा.उद्घाटन व उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते सिंबॉसीस इंटरनॅशनल विद्यापीठाचे कुलपती शांताराम बळवंत मुजूमदार यांना 'जीवनगौरव पुरस्कार' वितरण होणार असल्याची माहिती प्राचार्या डॉ. अनिता बोडके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. विश्वनाथ देशमुख म्हणाले, या महोत्सवातून सृजन आणि सशक्त पिढी तयार व्हावी. असा उद्देश आहे. ता. २७ रोजी लघुपट,रांगोळी, फेस पेंटिंग, ब्रायडल लूक , चित्रकथी व ता.२८ रोजी आनंद बाजार, विनोदी कथाकथन, संवाद, काव्यांगण, बासरी वादन, तसेच ता.२९ रोजी एक संवाद , पारितोषिक वितरण समारंभ, व एकपात्री असे कार्यक्रम होणार आहेत.

पत्रकार परिषदेला डॉ.रघुनाथ कडाकणे,डॉ. धनंजय देवळालकर,डॉ. संजय पाठारे,डॉ.संजय मोरे उपस्थित होते.

सकाळ

# संगत चांगली ठेवाल, तर भविष्य उज्ज्वल

## देसाई : तनिष्का, कोल्हापूर पोलिस व रोटरी क्लब ऑफ गार्गीजतर्फे ‘जागर स्त्री सुरक्षेचा’

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : आयुष्यात संगत चांगली ठेवाल तर भविष्य उज्ज्वल आहे, असा सल्ला अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयश्री देसाई यांनी आज येथे दिला.

सकाळ तनिष्का व्यासपीठ, कोल्हापूर पोलिस व रोटरी क्लब ऑफ गार्गीज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘जागर स्त्री सुरक्षेचा’ जनजागृती उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्या डॉ. अनिता बोडके अध्यक्षस्थानी होत्या. राजाराम महाविद्यालयातील भूगर्भशास्त्र विभागाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : सकाळ तनिष्का व्यासपीठ, कोल्हापूर पोलिस व रोटरी क्लब ऑफ गार्गीज कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘जागर स्त्री सुरक्षेचा’ उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयश्री देसाई. समोर उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी.

देसाई म्हणाल्या, ‘‘सोशल मीडियाचा वापर अतिशय काळजीपूर्वक करावा. मुलींनी अनोळखी व्यक्तींशी सावधपणे वागावे. हेच वय आयुष्याला दिशा देणारे असल्याने चांगल्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा.’

डॉ. क्रांती पाटील यांनी मुला-मुलींचे नाते निखळ असावे, असे सांगितले. पोलिस कॉन्स्टेबल तरन्नूम चौगले यांनी निर्भया पथकाबद्दल माहिती सांगितली. वुशू असोसिएशनचे सचिव सतीश वडणगेकर, पूजा पवार, मधुरा मगदूम, तौफिक अत्तार यांनी दैनंदिन वापरातील वस्तूंपासून स्वतःचा बचाव कशा पद्धतीने करावा, याचे प्रात्यक्षिक दाखविले. सायबरच्या समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्त्री सुरक्षा जनजागृतीबाबत पथनाट्य सादर केले. विभागप्रमुख डॉ. सोनिया राजपूत, डॉ. दीपक भोसले, डॉ. सुरेश आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली ते सादर झाले. रोटरी क्लब ऑफ गार्गीजच्या सचिव लक्ष्मी शिरगावकर, कॉन्स्टेबल मनीषा गुरव, प्रणाली भोसले, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. सूरज सोनवणे, प्रा. गणेश पाटील उपस्थित होते. ‘सकाळ’चे सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा यांनी प्रास्ताविक केले. काजल पाटील व साहिल माने यांनी सूत्रसंचालन केले. तनिष्का व्यासपीठाचे जिल्हा समन्वयक सुशांत पाटोळे व सचिन चौगुले यांनी संयोजन केले. राजाराम महाविद्यालयाचे विशेष सहकार्य मिळाले.



“ महिलांतील ऊर्जा प्रेरणादायी आहे. ती अबला नसून सबला आहे. तिचे संरक्षण ती करू शकते. तिला कुटुंब, समाजाचे पाठबळ मिळाले तर ती मागे वळून पाहणार नाही. जागर स्त्री सुरक्षेचा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. भविष्यातही अशा उपक्रमांना प्राधान्य देऊ

**- योगिनी कुलकर्णी,**
अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ गार्गीज, कोल्हापूर



“ मुली, महिलांना स्वत:चे संरक्षण करता येणे आवश्यक असून, त्यासाठी त्यांच्यातील ऊर्जेला फुंकर घालण्यासाठीचा हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. त्यात मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत.

**- सतीश वडणगेकर**
(सचिव, वुशू असोसिएशन)



“ देशातील महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाचल्या की, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येतो. महाविद्यालयीन मुलींत वेळीच आत्मविश्वास निर्माण करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ देणे जरुरीचे आहे. त्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे.

**- डॉ. अनिता बोडके,** प्राचार्य, राजाराम महाविद्यालय

Kolhapur, Kolhapur-Today
09/10/2024 Page No. 102

सकाळ

# धोका पत्करा, स्टार्टअप यशस्वी होईल

## सचिन कुंभोजे : ‘यिन’-राजाराम महाविद्यालयातर्फे समर्पण बैठक

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : धोका पत्करण्याची तयारी ठेवाल तर स्टार्टअप सुरू करून यशस्वी व्हाल, असा कानमंत्र उद्योजक सचिन कुंभोजे यांनी आज येथे दिला.

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व राजाराम महाविद्यालयातर्फे आयोजित यिन समर्पण बैठकीत ते बोलत होते. त्यांनी ‘स्टार्टअप’ या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राजर्षी शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले होते.



कोल्हापूर : सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व राजाराम महाविद्यालयातर्फे आयोजित यिन समर्पण बैठकप्रसंगी उद्योजक सचिन कुंभोजे विद्यार्थ्यांसमवेत.

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

कुंभोजे म्हणाले, ‘‘जॉब मार्केट व बिझनेस मार्केट या संकल्पना समजून घेणे गरजेचे आहे. नोकरीसाठी कोल्हापूरची मुले-मुली पुणे, मुंबई व बंगळूरला पसंती देतात. त्यांचा माइंडसेट मात्र नोकरी करण्याच्या उद्देशाचा नसतो. तो उद्योग सुरू करण्यासाठी बनलेला असतो. त्यामुळे नोकरीत त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांना धोका पत्करून नेतृत्व करायचे असते. परिणामी नोकरीत ते फार काळ टिकत नाहीत. त्यांचा उद्योगात विशेष रस असतो. कोरोना काळात नोकरी गमावलेल्या आयटी अभियंत्यांना तेही उद्योग सुरू करू शकतात, हे लक्षात आले. तुमच्या डोक्यातील उद्योगाबद्दलची एखादी कल्पना असेल तर ती लहान बाळासारखी असते. ती बाजारात आणणार असाल तर त्यासाठी पोषक वातावरण हवे. त्याचबरोबर तसा ग्राहकही हवा.’’

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी उद्यमनगरची स्थापना करून उद्योजकांना प्रोत्साहन दिल्याचेही त्यांनी सांगितले. यूएसपेक्षा भारतीय मार्केट स्वीकारार्ह असून, अनेक कंपन्या कोल्हापुरात केवळ ट्रायलसाठी येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्या डॉ. अनिता बोडके यांनी मनोगत व्यक्त केले. ‘यिन’ सहायक व्यवस्थापक (पश्चिम महाराष्ट्र) अवधूत गायकवाड, अक्षता गोखले, पृथ्वीराज काळे, समीर शेख, सानिया सनदी, अल्फिया सय्यद, मृणाली पाटील, पृथ्वीराज पोवार, वेदिका जांगीड, संयोगिता मंडलिक, प्रीती जगताप, वैभवी दळवी, कविता उगारे, किरण जगताप यांनी संयोजन केले.

Kolhapur, Kolhapur-Today
22/09/2024 Page No. 6



**कोल्हापूर :** राजाराम महाविद्यालयात स्वयंसेवकांकडून मतदार जागृती करताना विद्यार्थी.

# 'एनएसएस' स्वयंसेवकांकडून मतदार जागृती

कोल्हापूर, ता. १७ : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजाराम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शहरात पोस्टरच्या माध्यमातून मतदार जनजागृती केली. सायबर चौक, माउलीचे चौक, राजारामपुरी आणि बसस्थानक या ठिकाणी पोस्टरद्वारे मतदारांना २० तारखेला मतदान करण्याचे आवाहन केले. महेश डुकूरवाडकर, आदित्य घडशी, साहिल माने, मानस कांबळे, प्रदीप म्हस्के, ओंकार अलदार सहभागी झाले. कार्यक्रम अधिकारी डॉ. सूरज सोनवणे यांनी आयोजन केले. प्राचार्या डॉ. अनिता बोडके यांचे मार्गदर्शन लाभले.

# राजाराम महाविद्यालयात 'यूथ फ्लरिशिंग'वर मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. ११ : येथील राजाराम महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून 'यूथ फ्लरिशिंग' या विषयावर निर्माण सर्च या संस्थेच्या जुई जामसांडेकर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी तरुणांना समाजसेवेसोबतच अर्थपूर्ण जीवन कसे जगता येईल, जीवनाचा हेतू काय असावा, याबाबत मार्गदर्शन केले. पद्मश्री अभय बंग आणि राणी बंग यांनी स्थापन केलेल्या निर्माण सर्च या संस्थेच्या माध्यमातून तरुणांना योग्य दिशा देण्याचे काम केले जात असल्याचे जामसांडेकर यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. अनिता बोडके होत्या. डॉ. सूरज सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. धनंजय देवळालकर यांनी आभार मानले.

# राजाराम महाविद्यालय येथे जनजागृती रॅली

## ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त राजाराम महाविद्यालय आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांच्या वतीने ऊर्जा संवर्धन सप्ताह साजरा करण्यात येणार असून, शनिवारी राजाराम महाविद्यालयात सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना ऊर्जा संवर्धनाची सामूहिक शपथ देण्यात आली. यानिमित्ताने राजाराम महाविद्यालयात जनजागृती रॅली काढण्यात आली.

प्राचार्य डॉ. अनिता बोडके यांनी ऊर्जा संवर्धनाची गरज आणि शाश्वत विकासातील त्याचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. रॅलीत सर्व एन.सी.सी, एन.एस.एस, इतर विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारीही उत्साहात सहभागी झाले. ऊर्जा संवर्धन सप्ताहाच्या निमित्तांने भौतिकशास्त्र विभागातर्फे विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. एस. ए. पाटील, विजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. लता जाधव, डॉ. केतकी पाटणकर यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. डॉ. ओमप्रकाश पवार, प्रा. दीपाली धावणे, डॉ. अश्विनी साळुंखे, डॉ. क्रांती पाटील, यू. एस. भागवत यांचे सहकार्य लाभले. यावेळी डॉ. अंजली पाटील, नीता लाड, डॉ. संजय पाठारे, महेश काळे, अजय जाधव उपस्थित होते

---

**लोकमत**



राजाराम महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा प्राचार्य डॉ. अनिता बोडके यांनी सत्कार केला. यावेळी डॉ. लता जाधव, प्रा. डॉ. अतुला पाटील, डॉ. अश्विनी साळुंखे, उपस्थित होत्या.

# उपलब्ध संसाधनांचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करा

## शिंदे : राजाराम महाविद्यालयात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उपलब्ध संसाधनांचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मंगळवारी केले. राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त राजाराम महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागामार्फत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अनिता बोडके अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. शिंदे म्हणाले, औद्योगिक व वैज्ञानिक प्रगती करत असताना त्याचे उद्दिष्ट हे मानवी जीवन सुखकर करणे असून, ते करताना नैसर्गिक जैवविविधतेला धक्का पोहोचणार नाही, याची काळजी घ्या. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना पारंपरिक ज्ञानाचाही आढावा घेतला गेला पाहिजे. देशाची वैचारिक संपत्ती जपून व त्याला विज्ञानाची जोड देऊन देशाला वैश्विक महासत्ता बनवणे हेच ध्येय असले पाहिजे. पण हे सर्व करताना सध्या होत असलेल्या जैविक खनिजांचा ऱ्हास आटोक्यात आणायला हवा. भौतिकशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. लता जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. डॉ. अतुला पाटील, डॉ. अश्विनी साळुंखे उपस्थित होते. अनुप कारेकर यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Kolhapur
Page No. 4 Aug 30, 2024
Powered by: erelego.com

---

# 'राजाराम'मध्ये उद्बोधन कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. ४ :** राजाराम महाविद्यालयात 'ग्रीन क्लब'अंतर्गत उद्बोधन कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिता बोडके होत्या. महाराष्ट्र शासन आणि 'युनिसेफ'तर्फे सुरू झालेल्या 'ग्रीन क्लब'बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्रसाद मुदगल यांनी 'रिड्यूस, रियूज आणि रिसायकलिंग ऑफ प्लास्टिक' यावर मार्गदर्शन केले. 'युनिसेफ'तर्फे आदित्य जाधव यांनी पाण्याचे संवर्धन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा संवर्धनाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. सूरज सोनवणे यांनी ऑनलाईन कोर्सेसंदर्भात माहिती दिली. डॉ. ज्योती चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. लता भोपळे, डॉ. अतुल पाटील यांचे सहकार्य मिळाले. महाविद्यालय परिसर प्लास्टिकमुक्त करण्याची शपथ घेण्यात आली.

**सकाळ**

# उद्योजकतेसाठी संवाद, नियोजन, मार्केटिंगचे ज्ञान हवे

## प्रा. हर्षवर्धन पंडित : 'यिन', राजाराम महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'यिन संवाद'



कोल्हापूर : सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व राजाराम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित यिन संवाद उपक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. हर्षवर्धन पंडित.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : विद्यार्थ्यांनो, उत्तम संवाद, वेळेचे नियोजन व मार्केटिंगचे ज्ञान या त्रिसूत्रीच्या माध्यमातून तुम्ही यशस्वी उद्योजक होऊ शकता, असा कानमंत्र शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील प्रा. हर्षवर्धन पंडित यांनी आज येथे दिला.

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व राजाराम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित यिन संवाद उपक्रमात ते बोलत होते. त्यांनी 'उद्योजकता कौशल्य' विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. अनिता बोडके अध्यक्षस्थानी होत्या. राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

प्रा. पंडित म्हणाले, "समाजातील समस्या शोधून तुम्हाला व्यवसाय सुरू करता येईल. तत्पूर्वी, तुम्हाला तुमच्यात आवश्यक ते बदल करून घ्यावे लागतील. नव्या गोष्टी आत्मसात करून नेतृत्वक्षमता सिद्ध करावी लागेल. उद्योजक होण्यासाठी वयाचे बंधन असत नाही. तुम्ही आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर व्यवसाय सुरू करू शकता. व्यवसायासाठी लाखो किंवा कोट्यवधी रुपयांचे भांडवल लागेल, याचा विचार करू नका.

सातत्यपूर्ण प्रयत्नातून व्यवसायाला चालना देता येते. त्यासाठी मार्केटिंग कौशल्य शिकून घ्या आणि नोकरी मिळविण्याच्या मागे न लागता नोकरी देणारे बनण्यासाठी पुढाकार घ्या. नवे तंत्रज्ञान समजून घेताना व्यवसायासाठी सोशल मीडियाचा वापर कसा करता येईल, याची माहिती असणे जरुरीचे आहे. अथक कष्ट घेऊन व्यवसायात उतराल तर तुम्ही यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपाला नक्कीच याल."

याप्रसंगी डॉ. डी. पी. देवळालकर उपस्थित होते. यिन सहायक व्यवस्थापक (पश्चिम महाराष्ट्र) अवधूत गायकवाड, यिन प्रतिनिधी मोहन मोरे, यिन कोअर टीम अध्यक्ष अनोश कामत, यिन महापौर क्षितिजा उबाळे, भक्ती लवंगार-पवार, साक्षी संकपाळ, आदित्य फाले, श्रावणी गुरव, करण चौगुले यांनी संयोजन केले. करण माळी याने सूत्रसंचालन केले. डॉ. सूरज सोनवणे यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
23/03/2025 Page No. 102

# 'राजाराम'मध्ये यूथ ॲडव्होकसी कार्यशाळा

**कोल्हापूर :** राजाराम महाविद्यालयात यूथ ॲडव्होकसी कार्यशाळा झाली. 'युनिसेफ'तर्फे कार्यशाळेसाठी मदत मिळाली. जिया आंबले ही नेपाळ येथे प्रशिक्षण घेऊन आली आहे. या प्रशिक्षणाचा फायदा इतर विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी येथे आयोजन केले. गायत्री कुलकर्णी यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास'वर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अनिता बोडके, ग्रीन क्लब समन्वयक डॉ. ज्योती चव्हाण, युनिसेफ महाराष्ट्रचे कार्यक्रम अधिकारी बालाजी व्हरकत यांचे मार्गदर्शन लाभले. तन्मय रणदिवे, भक्ती लावंगार पवार, झिया जहागीरदार, समीक्षा बोलोलीकर, सानिया महात, साहिल माने, करण चौगुले, साक्षी संकपाळ, ओंकार ढेरे, समीक्षा पोकळे, तन्मय बनसोडे यांनी नियोजन केले.

**सकाळ**

# राजाराम महाविद्यालयातर्फे तिरंगा रॅली

**कोल्हापूर :** राजाराम महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेतर्फे राजाराम महाविद्यालय ते माऊली चौक, राजारामपुरी मार्गावर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीच्या माध्यमातून 'हर घर तिरंगा' मोहिमेबद्दल जनजागृती केली. सहभागी विद्यार्थ्यांनी देशभक्तीच्या घोषणा दिल्या. प्राचार्या डॉ. अनिता बोडके यांनी रॅलीला संबोधित केले. कोल्हापूर विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांनीही रॅलीला भेट दिली. डॉ. सूरज सोनवणे आणि डॉ. ओमप्रकाश पवार यांनी रॅलीचे आयोजन केले. डॉ. शीतल तावरे, डॉ. दीपाली धावणे, डॉ. पंकज लांडे, डॉ. जयवंत देशमुख यांचे योगदान लाभले.

Kolhapur, Kolhapur-Today
21/08/2024 Page No. 3

# 'राजाराम'मध्ये राष्ट्रीय सेवा दिवस

**कोल्हापूर, ता. २५ :** राजाराम महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा झाला. शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यावेळी प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्या डॉ. अनिता बोडके म्हणाल्या, 'राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भरता, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांचा विकास होण्यासाठी प्रयत्नशील राहावे.' यावेळी घेतलेल्या भित्तीपत्रक स्पर्धेत तनुजा कांबळे, साक्षी कोले आणि अहिल्या पोवार यांनी यश मिळविले. विविध शिबिरांमध्ये सहभागी झालेल्या प्रणित घस्ते, साहिल माने, करण चौगुले, स्वानंद गुरव, संस्कृती चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. सूरज सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शीतल तावरे यांनी आभार मानले. अहिल्या पोवार, प्राची पाटील, शर्वरी पोतदार, कृष्णानंद टोपकर, तन्मय रणदिवे, आदित्य घडशी, करण माळी यांनी नियोजन केले.

अन्वयार्थ

# तरुण म्हणतात, हाता-पायांना माती लागू द्या!

## युनिसेफ आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या 'युवक सहभाग आणि जल व्यवस्थापन' अभियानात अडीच लाख युवक सहभागी झाले आहेत. त्यानिमित्ताने...

**हवामान** बदलाच्या संकटांमुळे जगात तशी आपल्या गावातही नवनवीन आव्हानं उभी राहत आहेत. त्याने घाबरून चिंता करत बसायचे, की आपल्या परीने जे करता येईल ते करत राहायचं यापैकी काय निवडायचं हे प्रत्येकानं ठरवायचं आहे. महाराष्ट्रातल्या अडीच लाख तरुणांनी दुसरा पर्याय निवडला आहे. 'युवक सहभाग आणि जल व्यवस्थापन' या युनिसेफ आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग संयुक्त अभियानात अडीच लाख युवक त्यांच्या महाविद्यालयातील 'ग्रीन क्लब'चे सदस्य झाले आहेत. हाता-पायांना माती लागू द्या, निसर्गाच्या निकट जायला शिका, हाच या तरुणांचा आग्रह आहे!

छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, अहिल्यानगर, लातूर, धाराशिव, पुणे, सातारा, कोल्हापूर, ठाणे, मुंबई, पालघर व नागपूर या पाणीटंचाई असलेल्या आणि पाण्याची जास्त मागणी असलेल्या १३ जिल्ह्यांतील १५३० महाविद्यालयांत मार्च २०२३ मध्ये ग्रीन क्लब सुरू झाले आहेत. पाणी, ऊर्जा, स्वच्छता, जैवविविधता संरक्षण करणाऱ्या सवयी बाणवणे आणि पर्यावरणपूरक वातावरणनिर्मिती करणे हे ग्रीन क्लबचे मुख्य उद्देश आहेत. जलपरीक्षण, प्लास्टिक कचरा संकलन, पर्यावरणपूरक साहित्यनिर्मिती आणि कार्बन फूटप्रिंटचे मूल्यमापन यांसारख्या उपक्रमांमध्ये युवक सहभागी होत आहेत. त्यातून पर्यावरण सजग युवा नेतृत्वही उभं राहत आहे.

कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयातील जिया अंबले ही या हरित चळवळीत आघाडीवर आहे. 'पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. ग्रीन क्लबमुळे युवकांना एकत्र येऊन स्थानिक परिसरात प्रत्यक्ष बदल घडवण्याची संधी मिळते, त्यासाठी त्यांना प्रमाणपत्र आणि विशेष गुणही मिळतात,' असं जिया सांगते. गेल्या सप्टेंबरमध्ये जियाला नेपाळमध्ये युनिसेफ आरओएसए (दक्षिण आशिया प्रादेशिक कार्यालय)च्या यूथ अॅडव्होकेसी चॅम्पियन ट्रेनिंगमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. '१९ वर्षी मला या स्तरावर काम करण्याची संधी मिळेल, याची मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती.' ती म्हणते. ८ देशांतील ५० पेक्षा अधिक युवा कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधण्याचा अनुभव जियाला समृद्ध करून गेला.

**सयोगिता ढमढेरे**



मुक्त पत्रकार

'हवामान बदलामुळे आपलं आरोग्य, अन्नसुरक्षा, पाणी उपलब्धता आणि समाजावर खोलवर परिणाम होत आहेत,' हे शालेय प्रकल्पातून तिला समजलं. या जिज्ञासेचं आता पर्यावरण कार्यकर्ती होण्यात रूपांतर झालं आहे. 'हवामानबदल हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नसून एक सामाजिक आणि आर्थिक समस्या आहे आणि वंचित समुदायांवर त्याचा जास्त विपरीत परिणाम होतो आहे,' असं ती म्हणते. 'आपण स्वतःमध्ये बदल घडवू शकलो, तर आपल्या समुदायातही आपण तोच बदल घडवून आणू शकतो.' असा तिचा विश्वास आहे. 'युवा कार्यकर्त्यांना मला समाजाच्या सामर्थ्याची जाणीव करून द्यायची आहे आणि आपले पर्यावरणीय कार्यक्रम अधिक स्पष्ट आणि नावीन्यपूर्ण बनवायचे आहेत,' असं जिया म्हणते.

सावनेर येथील अनाठायी पाणीवापरामुळे व्यथित झालेला यश भोंगडे या कामाकडे वळला. यशने रेवनाथ चौरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि स्थानिक नागरिकांना शाश्वत जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरूक बनवलं आहे. यशच्या नेतृत्वाखाली ग्रीन क्लबने आरसीसी महाविद्यालयाला पर्यावरणपूरक कॅम्पसमध्ये रूपांतरित करण्याचं काम केलं आहे. पर्यावरणीय आव्हानांवरील चर्चासत्रांपासून जलपरीक्षणापर्यंत, कार्बन फुटप्रिंट कमी करण्यासाठी क्लबने विविध उपक्रम हाती घेतले.

'प्रत्येक व्यक्तीचा निर्णय महत्त्वाचा आहे,' हे पटवून देण्यासाठी यश प्रयत्नशील आहे. हवामान बदलाचा




सामना करण्यासाठी दैनंदिन जीवनात ऊर्जाबचत, कचऱ्याचं वर्गीकरण व कमीकरण, सार्वजनिक वाहतूक वापरणं यांसारख्या पर्यायांना प्रोत्साहन दिल्याने स्थानिक स्तरावर फरक पडेल. लहान मुलांना पर्यावरणसंवर्धक प्रत्यक्ष कृतीत सहभागी केल्याने, शाश्वत निवडींना प्राधान्य देणारी पिढी तयार होईल,' असे यश मानतो.

पुण्यात वाढलेल्या अफरोजने श्रीगोंद्यात आल्यानंतर पाणी, वीज आणि सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधा यांची कमतरता पाहिल्यावर तिला ग्रामीण भागातील पर्यावरण संरक्षणाचं महत्त्व कळलं.

अफरोजच्या प्रेरणेने लोकांनी प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी केली, तसंच पाणी संवर्धनाचं लेखापरीक्षण आणि पर्यावरणासाठी जनजागृती रॅलीजही आयोजित केल्या. अफरोजने मार्च महिन्यात 'द्रव्यांश २०२४' हा जलसंवर्धन उपक्रम घेतला. यामुळे अनेकांना जलसंवर्धनाच्या सवयी लागल्या. पर्यावरण संवर्धनाबद्दल असलेल्या ठाम विश्वासातून तिचं काम सतत वाढत आहे.

mediaworkersanyogita@gmail.com

जनमन